# सामंजस्य करार : डेक्कन महाविद्यालयाच्या १२००० हस्तलिखितांचे विनामुल्य जतन व संरक्षण मु.जे.महाविद्यालय करणार

ऐतिहासिक हस्तलिखितांचे महत्त्व जाणून मु.जे.महाविद्यालयाने नमामी अंतर्गत या हस्तलीखितांचे जतन व संरक्षण करण्याचा मोठा प्रकल्प हाती घेतला आहे. मु.जे. महाविद्यालय स्वायत्त झाल्यापासून प्रथमच सामंजस्य करार डेक्कन महाविद्यालय पुणे येथे २ मे रोजी केला. त्यात असे नमूद केले आहे कि डेक्कन महाविद्यालय पुणे येथील जवळपास १२००० हस्तलिखितांचे संरक्षण विनामुल्य करून देणार आहोत. डेक्कन महाविद्यालय येथील ग्रंथालयामध्ये खूप महत्त्वाचे ऐतिहासिक आणि पेशवेकालीन,अरेबिक,मोडी,संस्कृत,तेलगु भाषेमधील हस्तलिखित आहेत.



**फोटो : - डावीकडून डॉ.तृप्ती मोरे ,प्रो.डॉ . वसंत शिंदे, डॉ.उदय कुलकर्णी, डॉ.व्ही.एस.कंची व मधुकर बोंडे**

हा सामंजस्य करार डॉ.व्ही.एस.कंची (प्रकल्प समन्वयक) नमामी हस्तलिखित संरक्षण केंद्र,के.सी.ई.सोसायटीचे मु.जे. महाविद्यालय व प्रो.डॉ . वसंत शिंदे,(कुलगुरू डेक्कन महाविद्यालय),पोस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट, येरवडा,पुणे यांच्या मध्ये झालेला आहे.त्यावर प्रो.डॉ . वसंत शिंदे आणि डॉ.व्ही.एस.कंची यांच्या स्वाक्षरी आहेत.त्यात साक्षीदार डॉ.उदय कुलकर्णी (प्राचार्य,मु.जे. महाविद्यालय जळगाव),मधुकर बोंडे (संरक्षक ,नमामी हस्तलिखित संरक्षण केंद्र) आणि डॉ.तृप्ती मोरे (ग्रंथपाल, डेक्कन महाविद्यालय) आहेत. या संदर्भी हस्तलिखितांचे काम डेक्कन महाविद्यालय येथे लवकरच सुरु करणार आहोत असे मधुकर बोंडे (संरक्षक, नमामी, हस्तलिखित संरक्षण केंद्र) यांनी सांगितले.